सकाळ
शुक्रवार, ३० जानेवारी २००९

सौंदर्य



लेझर उपचार सुरू असताना.

# त्वचा पुनरुज्जीवन

**आपण सुंदर दिसावं असं आता प्रत्येकालाच वाटू लागलं आहे. असलेलं सौंदर्य जपणं आणि वाढवणं यासाठी आता अनेक उपचार उपलब्ध आहेत. सौंदर्य वाढविणाऱ्या उपचारांतील एक महत्त्वाचा उपचार म्हणजे त्वचेचं पुनरुज्जीवन. त्याच्या अनेक पद्धतींमध्ये लेझर उपचार अधिक प्रभावी असल्याचं आढळतं.**

डॉ. पराग सहस्रबुद्धे
प्लॅस्टिक सर्जन, पुणे

एक दिवस संध्याकाळी विद्या नावाची तरुणी भेटायला आली. त्या मीडियामध्ये काम करत होत्या. त्यांना चार दिवसांनंतर एका मोठ्या राजकीय नेत्याची मुलाखत घ्यायची होती. त्याकरता छोट्या पडद्यावर माझा चेहरा अधिक आकर्षक दिसण्याकरता काय करावे लागेल, असा प्रश्न त्यांनी केला. मीडियामध्ये काम करताना सतत फिरावे लागते, उन्हामध्ये जावे लागते, त्यामुळे चेहऱ्यावरची त्वचा रापली आहे, डोळ्याखाली काळी वर्तुळे आहेत व चेहरा ओघळल्यासारखा दिसतो. त्यावर उपाय काय, असा त्यांचा प्रश्न होता. असे काहीतरी करा, की चार दिवसांत माझा चेहरा तजेलदार दिसला पाहिजे. खरंच हे शक्य आहे का?

आजच्या वेगवान जगामध्ये अनेक सौंदर्यवर्धक उपचार पद्धती उपलब्ध आहेत- ज्यामुळे चेहऱ्यावर 'इन्स्टंट ग्लो' आणता येतो. आपला चेहरा वयानुसार निस्तेज होत जातो त्याची अनेक कारणे आहेत. उदा.- सूर्यकिरणांमधील अल्ट्रा व्हायोलेट रेंज, आपली बदलती जीवनशैली, धूम्रपान, मद्यपान, प्रदूषण इत्यादी. यामुळे चेहरा काळा पडणे, चेहऱ्यावर अकाली सुरकुत्या पडणे, डोळ्यांखालील त्वचा काळी पडणे, चेहऱ्यावर 'ब्लॅक हेड्स' किंवा मुरुमे (पिंपल्स) येणे, असे अनेक प्रकार होऊ शकतात. अशा प्रकारच्या सर्व तक्रारींकरिता अनेक उपाय उपलब्ध आहेत. आपल्या चेहऱ्याची त्वचा कुठल्या रंगाची आहे, तिचे किती नुकसान झाले आहे,